# कार्यालय-समग्र शिक्षा,शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद,वर्धा

**1 ला माळा,दालन क्र.105, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सिव्हील लाईन,वर्धा-442001**

**दुरध्वनी क्र.**07152-232428 **ई-मेल** :- ssawardha1@yahoo.co.in


पत्र क्रमांक जिपव/प्राशिवि/सशि/सकाअ/वशि- 6436 /2025 दिनांक :- 22/12/2025

## दरपत्रक सूचना

विषय :- समग्र शिक्षा अंतर्गत राष्ट्रीय आविष्कार अभियान सन 2025-26 या उपक्रमांतर्गत Exposure Visit Outside State या कार्यक्रमा करीता दरपत्रक मागविण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, समग्र शिक्षा अंतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियान सन 2025-26 या उपक्रमांतर्गत Exposure Visit Outside State अंतर्गत राज्याबाहेर विद्यार्थ्यांचे अभ्यासदौरा करिता तेलंगणा राज्यातील हेद्राबाद येथे इ. 6 वी ते 8 वीचे एकूण 50 विद्यार्थी व शिक्षक यांना शैक्षणिक अभ्यास दौ-या करीता वर्धा येथून जाणे-येणे आहे.प्रती व्यक्ती 8500/- रुपये मंजूर आहे.

अभ्यास दौ-यात शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणा-या शाळा, वारसा इमारती, ऐतिहासिक स्थळ, वैज्ञानिक दृष्टीकोण विकसित करणारी स्थळे धरेण, तारंगण या ठिकाणी भेटी द्यावयाचे आहे. सदर अभ्यास दौरा करिता सुविधा पुरविणा-या सेवा पुरवठादार यांचे कडून रेल्वे / बस प्रवास खर्च, निवास व भोजन व्यवस्था, विविध स्थळांना भेटी करिता बस व्यवस्था व प्रवेश शुल्क इत्यादीसह सर्व प्रकारचे करासह दरपत्रक खालील नमून्यात अनुभवी व इच्छूक सेवापुरवठा दारांनी दिनांक 29 / 12 /2025 पर्यंत सिलबंद लिफाप्यात या कार्यालयाला सादर करावे.

| अ.क्र. | अभ्यास दौ-या करीता निर्धारीत करण्यात आलेली स्थळे | अभ्यास दौ-यातील सहभागी व्यक्तींची संख्या संभाव्य कालावधी | अभ्यास दौ-यामध्ये पुरविण्यात यावयाच्या सेवा | सर्व प्रकारचे करासह प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 1 | तेलंगणा या राज्यातील हेद्राबाद येथील नेहरु झु पार्क, सालारजंग म्युझीयम, के.ब्रम्हानंद रेड्डी नॅशनल पार्क, द स्नो वर्ड, चारमिनार,गोलकोंडा पार्क | 50 व्यक्ती<br>संभाव्य कालावधी माहे जानेवारी 2026 दरम्यान (सदर कालावधी संभाव्य असून यामध्ये बदल होऊ शकते) | 1. रेल्वे प्रवासखर्च (जाने -येणे)<br>2.बस प्रवास खर्च (प्रती दिवस भाडे)<br>3.निवास व्यवस्था खर्च (प्रती दिवस भाडे)<br>4.चहा व भोजन दोन वेळा, व नास्ता एक वेळा, पाणी इत्यादी खर्च (प्रती व्यकती प्रती दिवस )<br>5.स्थळांना भेटी देण्याच्या टिकीट खर्च<br>याबाबतचा खर्चासह दरपत्रक सादर करणे वर नमुद मंजूर निधीच्या मर्यादेत असावा. | प्रति व्यक्ती रु.--------------- |

दरपत्रक मंजूरीचा अधिकार मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,वर्धा यांचेकडे राखीव राहील. सदर कामाचा कार्यादेश आवश्यकतेनुसार देण्यात येईल. शासनाचा Rate Contract असल्यास लिफाप्यात दरपत्रका सोबत ठेवण्यात यावा. दरपत्रक मंजूर झाल्यावर रु. 500/- चे Stamp Paper वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

टिप :- सदर दरपत्रक मध्ये नमूद दर हे सर्व प्रकारचे करासह असावेत.

| अ.क्र. | विवरण | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक सिलबंद लिफाप्यात कार्यालयास सादर करण्याचा कालावधी | दि.22/12/2025 ते 29/12/2025 |
| 2 | दरपत्रक स्विकारण्याचा वेळ | कार्यालयीन वेळेत |
| 3 | प्राप्त सिलबंद दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दि.30/12/2025 सांय 4.00 वाजता |

दरपत्रक उघडण्याचा उपरोक्त प्रमाणे नमूद तारखेत बदल करण्याचा संपूर्ण अधिकार मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.वर्धा यांना राहील.

**अटी व शर्ती :- (राज्या बाहेरील)**

1) वरील मंजूर दर हे सर्व करासह (उदा. एक्सप्रेस रेल्वे टिकीट खर्च, निवास व्यवस्था, चहा-अल्पोपहार व भोजन व्यवस्था, विविध स्थळांना भेटी देण्याकरीता बस व्यवस्था, GST व प्रवेश शुल्क इत्यादीसह असल्यामुळे यापेक्षा कोणताही अधिकचा निधी दिला जाणार नाही)
2) सदर तेलंगणा या राज्यातील हेद्राबाद येथील अभ्यास दौरा कालावधी 4 ते 5 दिवसाचा असणार आहे.
3) सर्व विद्यार्थी व सहभागी शिक्षकांना वर्धा येथून जाण्यायेण्यासाठी व भेट देण्यात येणा-या स्थळी प्रवासाची साधने, भेटीदरम्यान चहा,नाश्ता, भोजन, निवास व्यवस्था पुरविण्याची जबाबदारी सेवा पुरवठा धारकाची राहील.
4) प्रवास/अभ्यासदौरा कालावधी दरम्यान प्रथमोपचार पेटी सोबत असणे आवश्यक राहील.
5) प्रवास/अभ्यासदौरा कालावधी दरम्यान सर्व विद्यार्थी व सहभागी शिक्षक यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित सेवापुरवठाधारकाची राहील. सेवा पुरवठाधारकाकडे आवश्यक स्थानिक आपतकालिन/तातडीने संपर्क क्रमांक असणे आवश्यक राहील.
6) सदर भेटीच्या/अभ्यासदौरा स्थळांमध्ये शैक्षणिक क्षेत्रात कार्य कारणा-या संस्था, वस्तूसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय, तारांगण, वारसा इमारती, अभयारण्ये, माहित प्रसार केंद्र, भौगोलिक-ऐतिहासिक स्थळे, वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणारी स्थळे, धरणे यासारख्या बाबींचा समावेश असावा.
7) सदर शैक्षणिक अभ्यासदौरा मध्ये सहभागी विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी यांना जिल्हा परिषद वर्धा रेल्वे स्टेशन वर्धारोड येथून घेऊन जाणे व सोडण्याची जबाबदारी ही संबंधित सेवापूरवठाधारकाची राहील.
8) सदर शैक्षणिक अभ्यासदौरा सुरुवातीपासून ते अभ्यासदौरा संपेपर्यंत सहभागी सर्व विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी यांची चहा-नाश्ता व जेवनाची व्यवस्था सेवा पुरवठाधारकास करावी लागेल.
9) सदर शैक्षणिक अभ्यासदौरा हा 4 ते 5 दिवसाची होणार असून दोन ते तीन रात्र मुक्काम होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व अनुषंगिक व्यवस्था सेवापूरवठाधारकास करावी लागेल.
10) सदर अभ्यासदौरा करिता 46 विद्यार्थी व 4 अधिकारी / शिक्षक व शिपाई असे एकूण 50 व्यक्ती सहभागी होणार असल्यामुळे या सर्वांना सदर अभ्यासदौरा कालावधीमध्ये प्रवास,चहा-नाश्ता,जेवण व निवास व्यवस्था यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच जेवणाची व निवास व्यवस्था उत्तम असावी.
11) सदर कामाचे अग्रीम अनुज्ञेय राहणार नाही.
12) सहलीतील विद्यार्थी (आपला विद्यार्थी) ओळखता यावा यासाठी एकाच रंगाच्या टोप्या देण्यात याव्यात.
13) विद्यार्थी हे संपूर्ण वर्धा जिल्हयातील असल्याने वर्धा येथे रेल्वे स्टेशनवर पोहचल्यानंतर त्यांना तालुक्याला पोहचवून देण्यात यावे.
14) दरपत्रकासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावेत.
    1. शैक्षणिक अभ्यासदौरा सेवा पूरवठाबाबत अनुभव प्रमाणपत्र.
    2. GST Registration Certificate.
    3. PAN Card
    4. Travel Agency नोंदणीप्रमाणपत्र.
15) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. 500/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे आवश्यक राहील.

(डॉ.महेंद्र गजभिये)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,वर्धा